पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/ 8 /कावि/148 /2018
दिनांक- 5 /4 /2018

**विषय:- महापालिका संकेतस्थळावर विभागाअंतर्गत प्रसिद्ध करावयाच्या माहितीबाबत.**
**संदर्भ:- 1)** क्र.मातंवि/ 8/कावि/113/**2018** दिनांक- 14 / **3** /**2018**

परिपत्रक,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सर्व विभागांना मनपा संकेतस्थळावर विभागाअंतर्गत विभाग अधिकारी माहिती प्रसिद्ध करणेकामी व अद्ययावत ठेवणेबाबत कळविणेत आलेले आहे. तथापि, संकेतस्थळावर विभागांतर्गत प्रसिद्ध करणेत आलेल्या विभाग अधिकारी माहितीचे अवलोकन केले असता सोबत जोडणेत आलेल्या यादीमध्ये नमुद केलेल्या विभागांची माहिती अपुर्ण असल्याचे दिसुन येत आहे. सोबत सदर विभागांची यादी जोडणेत आलेली असुन सर्व विभागांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वेबसाईटवर आपल्या विभागाशी संबंधित विभाग अधिकारी माहिती, नागरिकांची सनद , विविध योजना इ. माहिती तपासुन त्यामध्ये काही बदल असल्यास सदरची माहिती दि। 2 /04/2018 पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभागाकडुन **Update** करुन घ्यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका संकेतस्थळावर मनपाचे विविध विभागांशी संबंधित इतर माहिती उदा. निविदा, कोटेशन, कामाचे आदेश, करारनामा, **DPR,** अंतर्गत परिपत्रके व आदेश, नागरिकांना देणेत येणा-या सेवा,विविध फॉर्म, **RTI** अंतर्गत प्रसिद्ध करावयाची माहिती इ. प्रसिद्ध करणेसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत प्रशिक्षण देऊन विभाग निहाय **Login** व **Password** देणेत आलेले आहेत. तरी विभागप्रमुखांनी संकेतस्थळावरील आपले विभागाची माहिती अद्ययावत ठेवणेकामी संबंधित काम करणा-या कर्मचा-यांस सुचना देणेत येऊन सदरची माहिती वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिद्ध करणेची कार्यवाही करावी . सदरबाबत काही तांत्रिक अडचण असल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधुन पुनःश्च प्रशिक्षण घेऊन आपले विभागाची उपरोक्त माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध / अद्ययावत करुन 13 /04/2018 पर्यंत प्रसिद्ध केलेबाबतचा अहवाल माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे सादर करावा.

अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,
सर्व संबंधित विभाग